सकाळ
पुणे, शुक्रवार
२५ नोव्हेंबर २०१६
४

र्थांची चव बदलते. त्याऐवजी
चवदेखील कायम राहते.
जी चिरण्यापूर्वी हाताला

## ॲडमिशन अपडेट

# समुपदेशन फेरीतून वैद्यकीय प्रवेशाची संधी

शासकीय, शासन अनुदानित तसेच विनाअनुदानित बीएएमएस, बीएचएमएस तसेच बीयूएमएस महाविद्यालयातील शिल्लक राहिलेल्या जागांवरील प्रवेशासाठी वैयक्तिक समुपदेशन फेरी (कौन्सिलिंग) २५ ते २८ नोव्हेंबर दरम्यान र. आ. पोदार वैद्यक महाविद्यालय वरळी, मुंबई येथे होणार आहे.

या अभ्यासक्रमाची कट ऑफ डेट आयुष मंत्रालयातर्फे ३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी 'डीएमईआर'तर्फे प्रवेशाच्या तीन फेऱ्या घेण्यात आल्या होत्या, परंतु राज्यातील शासकीयसह खासगी बीएएमएस व बीएचएमएस महाविद्यालयांना मान्यताच नसल्यामुळे तेथील जागांचे वाटप झालेले नव्हते. मात्र आता अशा शेकडो जागा मिळणार असल्याने या वाटपामधून विद्यार्थ्यांनी प्रवेशाची संधी शोधावी.

महाविद्यालयांच्या रिक्त जागांचा तपशील www.dmer.org या संकेतस्थळावर २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला आहे. एमएचटी- सीईटी-२०१६ मधून मिळालेल्या राज्य गुणवत्ता क्रमांकानुसार (२५ नोव्हेंबरला १ ते ८०००, २६ नोव्हेंबरला ८ हजार ते ४० हजार, २७ नोव्हेंबरला ४० हजार पुढील सर्व पात्र) सकाळी, दुपारच्या सत्रातच हजर राहावे.

### प्रवेशासाठीच्या अटी

- मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह हजर राहणे बंधनकारक.
- ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे व त्यांना बेटरमेंट हवी असेल, तर मूळ प्रमाणपत्र जमा असल्याची मूळ पावती सोबत न्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरलेला आहे, तेच विद्यार्थी फेरीसाठी पात्र ठरतील. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी बीएएमएस, बीएचएमएसमध्ये प्रवेश घेतलेला आहे व त्यांनी स्टेटस रिटेन्शन फॉर्म भरलेला असला तरीही ते वैयक्तिक समुपदेशन फेरीसाठी पात्र आहेत.
- ज्या विद्यार्थ्यांनी एमएचटी- सीईटी २०१६ प्रक्रियेनुसार आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी अभ्यासक्रम सोडून इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला आहे, असे विद्यार्थी या प्रक्रियेस पात्र नाहीत.

### समुपदेशन फेरी

- प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना तत्काळ १५०० रुपये रोख किंवा चेकद्वारे द्यावे लागतील. मूळ प्रमाणपत्रे तेथेच सादर करून प्रवेश घ्यावा लागेल.
- रिक्त जागांचा तपशील दररोज प्रवेश फेरी संपल्यानंतर संकेतस्थळावर जाहीर होणार.
- प्रवेश फेरीची माहिती ताज्या स्वरूपात प्रत्येक दहा मिनिटांनी अपडेट होणार.

### अत्यंत महत्त्वाचे

२७ नोव्हेंबरला संध्याकाळी पाच वाजता ज्यांनी यापूर्वी पसंतीक्रम भरलेच नाहीत, त्यांनाही रिक्त जागा राहिल्यास संधी मिळेल. बहुतेक विद्यार्थ्यांनी कोठेतरी आपला प्रवेश घेऊन शैक्षणिक वर्ष सुरू केलेले आहे, मागील अनेक वर्षांत एकदाही नोव्हेंबरमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविली गेलेली नाही. सरकारच्या चुकीमुळे या शाखेतील प्रवेशाची संधी मिळालेली असून, त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा. २७ नोव्हेंबरपर्यंत जागा शिल्लक राहिल्यास २८ व २९ रोजी पुन्हा फेरी होईल.

**हेमचंद्र शिंदे,** बारामती
(शब्दांकन : ज्ञानेश्वर रायते, बारामती)